संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज..
# माणदेश एक्सप्रेस
संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : १०९ ● ● गुरूवार दि. ०७ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

## बाबांना निवडून आणणारच, राजेंची डरकाळी



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : छत्रपती शाहू महाराज कोल्हापुरातून लोकसभेच्या रिंगणात उतरतील, अशी गेले काही दिवस चर्चा होती. अखेर या चर्चांवर शिक्कामोर्तब झालेले आहे. महाविकास आघाडीतील घटकपक्षांना उमेदवार म्हणून शाहू महाराजच हवेत. त्यामुळे शाहू महाराजांचा मविआतून लढण्याचा निर्णय झालाय. आमचे घराणे कष्टाच्या बाबतीत मागे पडत नाही. त्यांना निवडून आणण्यासाठी एक हजार टक्के प्रयत्न करू, अशी डरकाळी संभाजीराजे छत्रपती यांनी फोडली.

महाविकास आघाडी अंतर्गत कोल्हापूर लोकसभा जागेवर शिवसेना उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेसनेही दावा केला आहे. शाहू महाराज मविआकडून लढतील, अशी चर्चा होती. मात्र अधिकृतरित्या त्याची घोषणा झालेली नव्हती. अखेर आज संभाजीराजे छत्रपती यांनी पत्रकार परिषद घेऊन महाराजांच्या उमेदवारीचं 'ओपन सिक्रेट' फोडलं. तसेच निवडणूक काळातील रणनीती कशी असेल, याचीही माहिती दिली.

संभाजीराजे म्हणाले, लोकसभेला उतरण्याचं माझं निश्चित होतं, कोल्हापूर नाशिकची चर्चाही सुरू होती पण ज्यावेळी आमच्या बाबांचं (शाहू महाराज) कोल्हापूरची निवडणूक लढविण्याचं ठरलं, त्यावेळी त्यांना आमचा पाठिंबा असल्याचं मी सांगितलं. त्यांनी निवडणूक लढावी असा लोकांचा आग्रह होता तसेच त्यांचीही इच्छा होती. माझे वडील, मोठे महाराज माझ्यासाठी सर्वस्व आहेत. म्हणून मी आमच्या सगळ्या सहकाऱ्यांना सांगितलंय, मी जर निवडणूक लढवली असती तर आपण विजयासाठी १०० टक्के प्रयत्न केले असते. पण आज महाराज निवडणुकीच्या रिंगणात आहेत तर त्यांच्या विजयासाठी १००० हजार टक्के प्रयत्न करू. शाहू महाराज एक अभ्यासू व्यक्तिमत्व आहेत, त्यांचा अनुभव कोल्हापूरला नेहमी पुरोगामी दिशा दाखवेल, यात शंका नाही.

शाहू महाराज काँग्रेस, शिवसेना की राष्ट्रवादी पक्षाकडून लढणार हा कळीचा प्रश्न संभाजीराजेंना पत्रकारांनी विचारला. त्यावर ते कोणत्या पक्षाकडून लढणार हे मी कसं सांगू, त्यांची भूमिका मी कशी मांडणार...? असा प्रश्न विचारीत महाविकास आघाडीतील सगळ्या पक्षांना महाराजच पाहिजेत, असं वातावरण आहे. जो काही निर्णय महाराज घेतील, त्यांच्यासोबत मी स्वत: असणार आहे, शेवटपर्यंत आम्ही त्यांना साथ देऊ, अशी ग्वाही संभाजीराजेंनी दिली.

निवडणुकीकरिता वेळ कमी आहे, रणनीती कशी असेल? असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर ते म्हणाले, निवडणुकीसाठी काहीच अडचण येणार नाही. वेळोवेळी मोठ्या महाराजांचा सगळ्यांशी संपर्क आहे. माझा आणि मालोजीराजेंचा देखील संपर्क आहे. पण एकदा ठरलं की निवडणुकीपर्यंत सगळं काही व्यवस्थित होईल. कष्ट करण्यामध्ये आम्ही कुणीही मागे पडणार नाही, मी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढतोय, अगदी घरदाराचं तोंडही मी पाहत नाही. महाराष्ट्रात फिरतोय, लोकांशी संवाद साधतोय. निवडणूक काळातही तेच करू.

## जतमध्ये भरदिवसा कौटुंबिक वादातून एकाचा खून

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जत : जत येथील सोलनकर चौकात भर दिवसा दुपारी एक वाजण्याच्या सुमारास एकावर तलवार हल्ला करून खून करण्यात आला. मयत व्यक्तीचे नाव अविनाश बाळू कांबळे वय ३० असे आहे. हा खून कौटुंबिक वादातून झाले असल्याची चर्चा जत शहरात सुरू आहे. तलवारीने हल्ला करून खून केल्यानंतर मारेकरी पसार झाला आहे.

हा खून कौटुंबिक वादातून झाले असल्याचे चर्चा विजापूर- गुहागर या अत्यंत गजबजलेल्या गर्दीच्या ठिकाणी असलेल्या सोलनकर चौकामध्ये तलवार हल्ला केला. त्यानंतर मारेकरी पसार झाला आहे. दिवसाढवळ्यात झालेल्या खुणाच्या घटनेमुळे जत शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खुणाच्या घटनेची माहिती संपूर्ण तालुकाभर वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे घटनास्थळी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.

घटनास्थळी तातडीने पोलीस फौजफाटा, उपविभागीय पोलिस अधिकारी पोलीस यांनी भेट दिली. या खुनाचे गूढ अद्याप स्पष्ट झाले नसले तरी ही घटना कौटुंबिक वादातूनच घटना घडली असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात व तालुक्यात तर एकच खळबळ माजली आहे.

## येरळा नदीवरील बर्गे चोरणाऱ्या दोघांना अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

विटा : येरळा नदीवरील चिखलहोळ येथील बंधाराचे लोखंडी बर्गे (दारे) चोरणाऱ्या सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील दोघा संशयितास विटा पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून २ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अजित फुलचंद पाटील (वय २१, रा. मायणी) आणि अभिषेक सतीश कदम (वय १९, रा. शेडगेवाडी) अशी त्यांची नावे आहेत. या प्रकरणी पाटबंधारे विभागाचे शाखा धिकारी अमितकुमार प्रकाश साठे यांनी फिर्याद दिली होती.

याबाबत विटा पोलिसांनी सांगितले की, २६ ते २८ फेब्रुवारीरोजी चिखलहोळ येथील येरळा नदीवरील बंधाराचे १४ हजार किंमतीचे पाणी अडविण्यासाठीचे एकूण १४ लोखंडी बर्गे अज्ञात चोरट्यांनी पळवून नेले होते.





विटा : येरळा नदीवरील बर्गे चोरणारे चोरटे व तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच जप्त करण्यात आलेला मुद्देमाल

याबाबत पाटबंधारे विभागाचे शाखाधिकारी अमितकुमार साठे यांनी फिर्याद दिली होती.

विट्याचे पोलीस निरीक्षक शरद मेमाणे यांनी विटा पोलिसांच्या गुन्हे प्रकटी करण पथकास तपासाच्या सुचना दिल्या होत्या. या पथकातील अक्षय जगदाळे यांना टीप मिळाली की, मायणी येथील दोन व्यक्तींनी ही चोरी केली आहे. त्यावर सापळा रचून अजित पाटील आणि अभिषेक कदम यांना पोलीस ठाण्यामध्ये आणून सखोल तपास केला. त्यांनी हा गुन्हा केल्याबाबतची कबुली दिली. त्यांच्याकडून २ लाख रुपये किंमतीची टाटा- २०७ चारचाकी पिकअप गाडी, मोटरसाय कल (एम एच०२- एच ए ०९९२) आणि संबंधित १४ लोखंडी बर्गे जप्त करण्यात आले आहेत.

## वाळू लिलाव प्रक्रिया स्थगित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तहसीलदार कार्यालयाच्या आवारात जप्त करण्यात आलेल्या वाळूचा लिलाव काल दिनांक ०६ रोजी संपन्न होणार होता. परंतु अपेक्षित बोली न आल्याने सदरची वाळू लिलाव प्रकिया स्थगित करण्यात आली आहे.

आटपाडी तहसीलदार कार्यालयाच्या आवारात काल दिनांक ०६ मार्च रोजी जप्त करण्यात आलेल्या वाळूचा लिलाव तहसीलदार कार्यालयाच्या वतीने करण्यात येणार होता. या लिलाव प्रक्रियासाठी तीन जणांनी यामध्ये सहभाग घेतला होता. परंतु अपेक्षित बोली न आल्याने सदरचा वाळू लिलाव स्थगित करण्यात आला आहे.

या वाळू लिलाव प्रक्रियेमध्ये तिघांनी सहभाग घेतला. सुरुवातीच्या बोलीनंतर ६२ हजार रुपये पर्यंत बोली गेली होती. परंतु काही तांत्रिक कारणामुळे सदरची बोली स्थगित करण्यात आली.

## स्कूल व्हॅन चालकावर कोयत्याने हल्ला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: व्हॅन मालकासोबत न्यायालयात गेल्याचा राग मनात धरून स्कूल व्हॅन चालकावर दुचाकीवर आलेल्या दोघांनी कोयत्याच्या साहाय्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना वाघोलीतील बकोरी फाटा येथे बीजेएस कॉलेजजवळ सकाळी नऊच्या सुमारास घडली. हल्ल्यामध्ये व्हॅनच्या काचा फुटल्या असून व्हॅनमध्ये आठ विद्यार्थी होते. परंतु सुदैवाने कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही. याप्रकरणी सचिन इंगोले (वय २७, रा. वाघोली) या व्हॅन चालकाने फिर्याद दिली असून हल्ला करणाऱ्या अल्पवयीन तरुणासह आकाश तोरंभे (रा. वाघोली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार मोहन कदम हा व्हॅन मालक आहे. त्याच्याकडे इंगोले हा चालक म्हणून काम करतो. कदम यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्याची ६ मार्च २०२४ रोजी न्यायालयात तारीख होती. इंगोले हा कदम यांच्यासोबत न्यायालयात गेला होता. न्यायालयात का गेला याचा राग मनात धरून त्याने मित्राच्या साहाय्याने स्कूलमधून व्हॅन निघाल्यानंतर चालकावर कोयत्याच्या साहाय्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पुढे बसलेल्या विद्यार्थ्याला ही काच लागून तो किरकोळ जखमी झाला.

या प्रकाराने घाबरलेल्या विद्यार्थ्यांनी आरडाओरडा केला. यानंतर हे हल्लेखोर पळून गेले.

## गजानन विकास सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी हणमंत गळवे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : येथील मापटेमळा येथील गजानन सेवा विकास सोसायटीच्या चेअरमनपदी माजी सरपंच हणमंत गळवे तर व्हा. चेअरमनपदी नामदेव फुले यांची निवड करण्यात आली.

मापटेमळा येथील गजानन सेवा विकास सोसायटीच्या चेअरमन व व्हा. चेअरमनपदाच्या निवडी आटपाडी सहाय्यक निबंध कार्यालय येथे संपन्न झाल्या. यामध्ये चेअरमनपदी मापटेमळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हणमंत गळवे तर व्हा. चेअरमनपदी नामदेव फुले यांच्या बिनविरोध निवडी संपन्न झाल्या.

सदरच्या निवडी या सहाय्यक निबंधक सागर गवंड यांच्या मार्गदर्शनाखाली व निवडणूक निर्णय अधिकारी श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्या.





**आटपाडी : निवडी नंतर आटपाडी बाजार समिती येथे हणमंत गळवे व नामदेव फुले यांचा सत्कार करताना सभापती संतोष पुजारी व उपस्थित मान्यवर**

निवडीनंतर नूतन चेअरमन हणमंत गळवे व व्हा. चेअरमन नामदेव फुले यांचा सत्कार जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील, बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी यांच्या हस्ते करण्यात आला.


यावेळी बाजार समितीचे संचालक सर्वश्री सुबराव पाटील, धनाजी खिलारी, सुनील सरक, सुनील तळे, पिंटू सरगर, माणगंगा सहकारी कारखान्याचे संचालक जगन्नाथ लोखंडे, जालिंदर नवले, नानासो माळी, सुभाष सातारकर, सोसायटीचे माजी चेअरमन शिवाजीराव बनसोडे, संचालक दामोदर केंगार, दत्तात्रय होनमाने, श्रीराम माळी, शिवाजीराव पुजारी, सचिव प्रकाश फुले, उत्तम माळी, उत्तम बालटे, शेटफळचे माजी उपसरपंच विजय देवकर, पोपट बालटे, गोरख बालटे, दिपक बालटे, मकरंद गुळीग, विजय बालटे, डॉ.जितकर, नामदेव बालटे, अर्जुन लांडगे, सुनील लोखंडे, संजय खिलारी,सुधीर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## नृत्य संध्या व गुढी महाराष्ट्राची मधून नृत्याचा सांस्कृतिक जागर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई व सांगली जिल्हा प्रशासन यांच्यावतीने कल्पद्रुम मैदान नेमिनाथनगर सांगली येथे २ ते ६ मार्च पर्यंत आयोजित महासंस्कृती महोत्सवाच्या आज चौथ्या दिवशी सायंकाळी नृत्य संध्या व गुढी महाराष्ट्राची मधून नृत्याचा सांस्कृतिक जागर केला गेला.

नृत्य संध्या कार्यक्रमांतर्गत भरतनाट्यम, कथ्थक, मंगळागौर आदी विविध कार्यक्रमांमधून लोककलेचा जागर करण्यात आला. सणांची माहिती देणाऱ्या गुढी महाराष्ट्राची कार्यक्रमामध्ये सण कशा पध्दतीने साजरे केले जातात हे उपस्थितांना दाखवून दिले.



सांगली : येथे नृत्य संध्या कार्यक्रमांतर्गत भरतनाट्यम, कथ्थक, मंगळागौर आदी विविध कार्यक्रमांमधून लोककलेचा जागर करताना कलाकार

संगीत व नृत्याचा नेमका मेळ घालून गुढीपाढवा, बैल पोळा, पंढरीची वारी, नारळी पौर्णिमा, दहीहंडी, गणेशोत्सव, मोहरम आदी सण सादर केले. या कार्यक्रमांना टाळ्यांच्या गजरात रसिकांनी दाद दिली.

याचबरोबर या ठिकाणी सुरू असलेल्या प्रदर्शनीय कलादालनाला आजही सांगलीकरांनी चांगली दाद दिली. महासंस्कृती महोत्सवाची बुधवार, ६ मार्च रोजी सांगता होणार असून ६ मार्च रोजी सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत वाद्य रजनी कार्यक्रमांतर्गत विविध लोकवाद्यांचे सादरीकरण / जुगलबंदी होणार आहे. तर सायंकाळी ७ ते रात्री ९.३० या वेळेत श्रीमंतयोगी कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील कलाअविष्कार हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## फार्मर कप प्रशिक्षणसाठी आटपाडी तालुक्याातील दहा गावांचा समावेश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : पानी फाउंडेशन फार्मर कप २०२४ चे अडीच दिवसाचे निवासी प्रशिक्षण दि. ११९ ते १३ मार्चपर्यंत पहिल्या बॅचने सुरु होत आहे. हे प्रशिक्षण भोसे येथील संजीवनी कृषी पर्यटन केंद्रात हसत खेळत पद्धतीने होणार असल्याचे फाउंडेशनचे समन्वयक सुहास आणि राजेंद्र पाटील यांनी सांगितले.

प्रशिक्षणला जाण्या-येण्यास एसटी बस उपलब्ध आहे. सर्व खर्च फाऊंडेशन करेल. आटपाडी पंचायत समिती येथे एसटी थांबेल. १९ मार्च सोमवार सकाळी ९ वाजता आटपाडी पांचायत समिती येथे हजर राहण्याचे आहे. दोन दिवस गट शेतीच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध शेती तंत्र शिकण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणास खरसुंडी, गळवेवाडी, दिघंची, मानेवाडी, नेलकरंजी, शेटफळे, करगणी, पुजारवाडी (आटपाडी), कामथ, घाणंद गावांचा समावेश आहे/ परंतु या प्रशिक्षण शिबिरास आणखी कोणा गावास सहभागी व्हायचे असेल तर फाउंडेशनचे तालुका समन्वयक सुहास आणि राजेंद्र पाटील यांच्याशी संपर्काचे आवाहन करण्यात आले आहे.

## बनपूरीत बस थांब्याची, प्रसाधनगृहाची सोय करा : सादिक खाटीक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आमदार, जि.प. अध्यक्ष, तालुका पंचायत समितीचे चार सभापती दिलेल्या, आटपाडी तालुक्याची राजधानी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या, सरकारांच्या बनपूरी मध्ये चार दिशांना जाणाऱ्या चौकातल्या रस्त्यावर आठ पीकअप शेड/ निवारा बस थांब्याची शेकडो प्रवाशांना नितांत गरज असून शासनाने तातडीने यावर उपाय योजना करावी, अशी मागणी सादिक खाटीक यांनी केली आहे.

सुमारे सात हजार लोकसंख्या असलेल्या बनपूरी, शेंडगेवाडी व परिसरातल्या शालेय महाविद्यालयी मुले, मुली मोठ्या संख्येने आटपाडी, तडवळे, करगणी, खरसुंडी या चारही दिशांच्या प्रशाला महाविद्यालयांकडे प्रतिदिनी जा-ये करतात. यांच्यासह ग्रामस्थांचीही या चारही दिशांच्या गावांकडे नेहमीच जा-ये असते. वयोवृद्ध, आजारी व्यक्ती, कामाला जाणारे नोकर, चाकर, मजूर शेतकरी, माता, भगिनी यांना बनपूरी चौकात वाहनांची प्रतिक्षा करताना उन, वादळ, वारा, पाऊस या नैसर्गिक व्यवस्थांचा तासन् तास सामना करावा लागतो. बनपुरीच्या मुख्य चौकातून आटपाडी, तडवळे, करगणी, खरसुंडी कडे जाणारे मोठ्या वर्दळीचे मुख्य रस्ते आहेत. या चौकात सकाळपासून रात्री उशीरापर्यत कामाचे, बिगर कामाचे, हौशे, गवशे, नवसे इत्यादींची सतत वर्दळ-रेलचेल असते. या चारही रस्त्याला खेटूनच मोठ्या संख्येने व्यावसायीकांची दुकाने असल्याने विविध गावांना जाणाऱ्या चारही दिशांच्या रस्त्यावर शालेय मुली, विद्यार्थीनी, युवती, माता, भगिनी, रुग्ण, प्रवाशी महिला यांची मोठी कुचंबणा होत असते.

उन, वादळ, वारा, पाऊस यापासून बचाव व्हावा. वाहने येईपर्यत सुस्थितीत सावलीत बसता यावे. यासाठी या चारही दिशांना ८ निवारा बस थांब्याची/पिकअप शेडची नितांत गरज आहे. या चौकातच महिला व पुरुष यांच्यासाठी सुलभ प्रसाधन गृहांची या बस थांब्याला जोडूनच सोय केली जाणे अति गरजेचे आहे. या मुलभूत गरजे ठरू पाहणाऱ्या या मागणीकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे आणि ही जनहिताची मागणी सत्वर वास्तवात आणावी, लोकसभा/विधानसभा निवडणूका डोळ्यासमोर ठेवून कोट्यावधी रुपयांच्या विकास कामांना मंजुरी, भूमीपुजनांचा धुमधडाका सर्वत्र सुरू आहे. बनपूरीतल्या या अत्यावश्यक मागणीवर निधी मंजूर केल्याचा केवळ फार्स न होता, हे काम सत्वर पूर्णत्वास जाण्याच्या दृष्टीने सर्वांनी इमानदारीने प्रयत्न करावेत, असेही आवाहन सादिक खाटीक केले आहे.



आटपाडी : बनपुरी : बनपुरीच्या मुख्य चौकातून बनपूरीत बस थांब्याची, प्रसाधनगृहाची सोय करण्याची मागणी होत आहे.

## * संपादकीय *

# पाठशिवणीचा दुर्दैवी खेळ

महाराष्ट्रात विविध समाजांना आणि विशेषकरून मराठा समाजाला आरक्षण देण्यावरून जी कमालीची गुंतागुंत आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे; तिच्यावर मागासवर्ग आयोगाचा अहवाल हे टिकाऊ उत्तर आहे का; याची बिलकुल शाश्वती नाही. या आयोगाचा अहवाल स्वीकारून विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा समाजासाठी दहा टक्के आरक्षण देण्याचा ठराव मंजूर करण्यात येईल, असे सांगितले जाते. असे हे दुसऱ्यांदा होते आहे. मागे उच्च न्यायालयाने उचलून धरलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने नामंजूर केले होते. तसे पुन्हा होणारच नाही, याची आज काहीही हमी नाही. राज्य सरकारने मांडलेला प्रस्ताव विधिमंडळाने मंजूर केला तरी त्याची घटनात्मक वैधता पुन्हा न्यायालयीन प्रक्रियेत तपासली जाऊ शकते. आता यावेळी मागासवर्ग आयोगाच्या अहवालाच्या मागे राज्यभरात झालेले अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण ही एक भक्कम पाठराखण आहे, अशी अनेकांची समजूत आहे. ती खरी आहे का आणि हे सर्वेक्षण कितपत शास्त्रीय पद्धतीने तसेच बिनचूक झाले आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. ती अनेकांना सोयीची नसली तरी आज ना उद्या शोधली जातीलच. तिकडे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन चालूच असून त्यांच्या वारंवार होणाऱ्या उपोषणांमुळे त्यांची व त्यांच्या आंदोलनाची तब्येतही घसरत चालली आहे. ती कशी सावरली जाणार, हा ही एक प्रश्न आहे.

महाराष्ट्र गेली अनेक वर्षे या प्रश्नामुळे अस्वस्थ आहे. कोणाचेही सरकार आले तरी ते या प्रश्नापुढे आजवर हतबल झाले आहे. त्या हतबलतेमागे मुख्यत: घटनात्मक तरतुदींची मर्यादा आहे, हे लक्षात घ्यायला हवे. ही मर्यादा कशी ओलांडायची, हा यातला मूळ प्रश्न आहे आणि तो राज्य सरकार किंवा विधिमंडळाच्या तत्त्वत: अखत्यारीतील नाही. तसा तो नसल्यानेच सर्वोच्च न्यायालयाने मागे एकदा हे आरक्षण रद्दबातल ठरविले होते. मराठा समाजाच्या भावना व मागण्या आणि कायद्यांची व घटनेची चौकट यांचा ताळा जोवर जमत नाही, तोवर या प्रकरणी निर्णायक व टिकाऊ तोडगा निघणार नाही. राज्य सरकारला मागासवर्ग आयोगाचा अहवाल सादर झाला असला तरी सध्या चालू असणाऱ्या प्रक्रियांमधील विरोधाभास आणि अंतर्विरोध नोंदविणे आवश्यक आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर राज्यात कुणबी नोंदी शोधण्याचे काम चालू झाले. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील, त्यांचा समावेश स्वाभाविकच ओबीसी आरक्षणात होऊ शकतो. याला ओबीसी नेते विरोध करीत आहेत आणि प्रतिआंदोलनाच्याही हाका देत आहेत, हा एक वेगळाच मुद्दा झाला. खरा प्रश्न असा आहे की, उद्या विधिमंडळाने मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले तर त्यात या धावपळीने कुणबी दाखला मिळविलेल्या समाजाचा समावेश होणार आहे का? तसा तो होणार असेल तर सध्या ओबीसींमधून आरक्षण मिळविण्याची धावपळ कशासाठी चालू आहे? आणि 'मराठा आरक्षण' यात 'कुणबी' या ओबीसी प्रवर्गाचा समावेशच होणार नसेल तर आजवर जे मराठा म्हणजेच कुणबी असे सांगितले गेले; त्या युक्तिवादाचे काय करायचे?

उद्या हा प्रश्न पुन्हा न्यायालयात गेला आणि न्यायालयाने मागासवर्ग आयोगाचा अहवाल मान्य करून मराठा समाजाचे मागासलेपण मान्य केले तर अपवादात्मक परिस्थिती म्हणून हे आरक्षण टिकूही शकेल. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वेळी दिलेला निकाल यावेळी बदलू शकेल, इतके भक्कम काम मागासवर्ग आयोगाने केले आहे काय आणि त्याचे प्रतिबिंब त्यांच्या नव्या अहवालात पडले आहे काय, हे तपासावे लागणार आहे. आयोगाने नोकऱ्या आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रांसाठी १२ आणि १३ अशी आरक्षणाची टक्केवारी ठरविली असावी. ती कमी करून सरकारने सरसकट दहा टक्के केली तरी आंदोलकांचे समाधान होऊ शकेल. मात्र, उद्या हे आरक्षण सुरू झाल्यास काही समाजाला नव्या आरक्षणाच्या तरतुदीतून सवलत आणि काहींना मात्र कुणबी या प्रवर्गासाठी असणाऱ्या आरक्षणाच्या टक्केवारीतून सवलत असा पेच निर्माण होऊ शकतो. हा मुद्दाही उद्या न्यायालयीन चिकित्सेत येणारच नाही, असे नाही. हा अहवाल देणाऱ्या मागासवर्ग आयोगातील तीन सदस्यांनी आधी राजीनामे दिले होते आणि अगदी शेवटच्या टप्प्यावर चौथ्या सदस्याला निरोप देण्यात आला. हे सारे आयोगाच्या कामकाजाची विश्वासार्हता वाढविणारे नाही. 'काहीही करा आणि आम्हाला हवा तसा अहवाल लवकरात लवकर द्या,' असे जर कुणी म्हणत असेल तर त्यातून केवळ अशास्त्रीय घाई आणि राजकीय अपरिहार्यता दिसते. ती मराठा समाजाच्या अंतिमत: कल्याणाची ठरेलच, असे नाही. गेली काही वर्षे मराठा आरक्षणाबाबत एकीकडे आंदोलनांच्या लाटा आणि दुसरीकडे, हंगामी तोडग्यांच्या वाटा; असा पाठशिवणीचा दुर्दैवी खेळ चालू आहे. यातून महाराष्ट्राची कायमची सुटका करण्यासाठीची राजकीय इच्छाशक्ती केवळ मुंबईत नव्हे तर राजधानी दिल्लीत असणे आवश्यक आहे.




महाविद्यालयीन जीवनामधील शिक्षक व विद्यार्थ्यांकरिता असलेला एक महत्त्वाचा पाडाव म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस). त्याच्या विविध योजना, नेमून दिलेली विविध कामे, अनेक समाजोपयोगी उपक्रम, दत्तक घेतलेले गाव, मित्र-मैत्रिणींसोबतचे सुंदर टीम-वर्क, बसवलेली पथनाट्यं, एकमेकांसोबत केलेली भरपूर मस्ती आणि अर्थातच हे सगळे करत असताना, हळूहळू येत गेलेले समाजभान! एनएसएस हे खरोखरच एक अतिशय निराळे विश्व आहे आणि त्यातही एनएसएसचे वार्षिक शिबीर म्हणजे या सर्वांवर कळस. एनएसएस शिबिरासारखी क्वचितच दुसरी कोणती शाळा असेल. शिबिराच्या दहा दिवसांमध्ये विद्यार्थी जे शिकतात, ते कदाचित दहा वर्षांच्या पाठ्यक्रमातूनही समजणार नाही.

एनएसएसच्या मांडवाखालून गेलेल्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये आमूलाग्र बदल झालेले मी पाहिले आहेत. या उपक्रमातून खंदे, कळकळीचे कार्यकर्ते निर्माण झाले आहेत, सेवाभावी संस्था उभ्या राहिल्या आहेत. पुन्हा महाविद्यालयाकडे परत येऊन, अशा उपक्रमांना मदत करण्याची वृत्ती, अनेक शिबिरार्थींनी अंगीकारली आहे. एक प्राध्यापक आणि भारताचा सुजाण नागरिक म्हणून मला कायमच असे वाटते की, एनएसएस हा ऐच्छिक उपक्रम न ठेवता अनिवार्य व्हायला हवा. किमान एनएसएस शिबीर तरी प्रत्येक विद्यार्थ्याने अनुभवावे. आपली नाळ समाजाशी थेट जोडणारा हा उपक्रम आहे.

शिबिराला जाताना पोत्यांमध्ये भरलेले सामान, तिथे गेल्यावर चुलीवरचा स्वयंपाक, तोडून आणलेली लाकडांची मोळी, श्रमदान, समाजातील वेगवेगळ्या नेतृत्ववीरांचे मार्गदर्शन, रात्री रंगणाऱ्या वेल्हाळ गोष्टी, भल्या पहाटेची कवायत, त्यानंतरचा गरमागरम वाफाळलेला चहा, कडक शिस्त, पण त्यातही केलेली धमाल या सगळ्यांची मजा काही औरच... संध्याकाळी वीज गेल्यानंतर, एकत्र जमून खेळलेले अनेक मानसशास्त्रीय व सामाजिक खेळ, सर्वांनी सर्वार्थाने एका सुरात गायलेली गाणी, नोव्हेंबर-डिसेंबरमधली दात वाजवणारी थंडी, जंगलातले खासमखास सरपटणारे दोस्त, शहरात सहसा वाट्याला न येणारा सूर्योदय, रात्री चांदण्याने भरून गेलेले आकाश, चमचमणाऱ्या मांडवाखाली रंगलेली मुलांच्या भेंड्यामधली गाणी, झाडी, गायी, गुरे व शाकारलेली घरे, या घरट्यांमधून जवळचे झालेले कोणी काका, कोणी काकू, मिणमिणते दिवे, मोबाइलच्या बॅटऱ्या, घराची ओढ, हुरहूर आणि दोस्त मंडळींच्या सहवासाची नशा आणि ह्या सर्वांवर खास कडी म्हणजे शेवटची 'कॅम्प फायरची रात्र'! कॅम्प-फायर साजरा करण्यासाठी आवर्जून आलेले जुने, नवे विद्यार्थी, हे संपूर्ण अनुभव विश्वच महाविद्यालयीन अनुभवाला सधन करणारे आहे. वर्गामध्ये काहीशी एकसूरी वाटणारी मुले, शिबिरात मात्र वेगळीच भासतात, त्यांचे व्यक्तिमत्व छान फुलून येते. कोणी आज्ञाधारकतेमुळे लक्षात राहतात, कोणी खट्याळपणामुळे, कोणी एखाद्या खास गुणामुळे तर कोणी काम करण्याच्या इच्छेमुळे. खरंच एनएसएस शिबिरामध्ये मुले खूप काही शिकतात आणि शिकवूनही जातात.

एनएसएस माझ्याकरिता मयूरपंखी आठवणींचा खजिना आहे. मानवी मनाचे अनेक कंगोरे उलगडून दाखवणारे अनुभव या शिबिरामधून मला घेता आले. काही विद्यार्थ्यांविषयीचे काही सहकाऱ्यांविषयीचे, काही गावकऱ्यांचे तर काही गावातल्या चिमुकल्यांचे, या अनुभवांविषयी व्यक्त झाल्याखेरीज मला वाटते, एनएसएसशी जोडलेल्या कोणाही प्राध्यापकाचे स्वगत पूर्ण होणे अशक्य आहे. यातीलच काही गमती जमती व काही हृद्य आठवणी आपल्याबरोबर वाटून घेत आहे.

शिबिराच्या आधी अर्थातच सर्व प्राध्यापक मंडळी, विद्यार्थ्यांना अनेक सूचना देत असतात. त्यातील दोन महत्त्वाच्या सूचना म्हणजे, मुलींनी मेकअप आणू नये व सर्वच विद्यार्थ्यांनी मोबाइल नाही आणला तरी चालेल. जर का घरच्यांशी संपर्क करायची वेळ आली तर अर्थातच प्राध्यापकांचे मोबाईल, विद्यार्थी वापरू शकतात. विद्यार्थी या सूचनांकडे अर्थातच रीतसर दुर्लक्ष करतात. मला आठवतंय, अगदी सुरुवातीच्या काळात जेव्हा मोबाइल नवीन होते तेव्हा विद्यार्थ्यांनी या सर्वांकडे दुर्लक्ष केले होते. त्यांनी मोबाइल तर आणले होतेच आणि मुलींनी मस्तपैकी मेकअप किट्स पण आणले होते. पहिल्याच दिवशी मोबाइलची बॅटरी डिस्चार्ज झाली, ते निकामी झाले, कारण गावात अर्थातच कुठेही वीज नव्हती. पहाटेची कवायत, श्रमदान, जेवण बनवणे, संध्याकाळचे कार्यक्रम, मार्गदर्शन असा भरगच्च दैनंदिन काळ संपताच, जमिनीला पाठ लागताच मुलांचे डोळे मिटले. या सर्वांमध्ये मंडळी मोबाइल कधी विसरून गेली, ते त्यांचे त्यांनाही समजले नाही. काही हौशी विद्यार्थिनींनी सकाळी जाऊन, थंड पाण्याने आंघोळ केली, छान मेकअप केला. आम्ही याकडे थोडे दुर्लक्ष केले, श्रमदानासाठी मुले गावातल्या छोट्या शाळेभोवतीच मैदान साफ करायला गेली, हातात विळे, गवतात कोणी किडूक-मिडूक लपल्याची भीती आणि मस्त वर येत चाललेला मनस्वी तापता सूर्य बाप्पा, चेहऱ्यावरचे रंग, कधीच उडून गेले, पण कामात अशी काही एकता तयार झाली की, श्रमाचे समाधान मुलींच्या चेहऱ्यावर पसरले आणि ते थकलेले चेहरे बिनामेकअपचे अधिकच सुंदर दिसू लागले दुसऱ्या दिवशीपासून मोबाइल आणि मेकअपचे सामान कधीच बाहेर आले नाही.

एक समुपदेशक म्हणून माझ्याकरता ही एक प्राप्ती होती, कितीतरी विद्यार्थ्यांचे पालक मोबाइलमुळे, आमच्या मुलांचे नुकसान होते किंवा टीव्हीमुळे नुकसान होते, अशा तक्रारी घेऊन येत असत. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद नेहमी म्हणत की, एज्युकेशन इज कल्टिवेशन ऑफ हँड, हेड, हार्ट. याचा प्रत्यय देणारी राष्ट्रीय सेवा योजना. मला असे वाटते की, मुलांचे हात कामात ठेवले, गळ्यात गाण्यांचा तान ठेवली आणि मनात दुसऱ्यासाठी जगायचे भान ठेवले, तर मुले कधीच कुमार्गी जाणार नाहीत. गावांतील, खेड्यांतील, मुलांचे, स्त्रियांचे जगणे बघून, कितीतरी मुलांना, मी अंतर्मुख झालेले पाहिले आहे. स्वयंपाक करताना, पोळ्या लाटताना, भाकऱ्या थापताना, मुलगे नक्की म्हणायचे इथून घरी गेल्यानंतर आम्ही यापुढील आयुष्यात नक्कीच वेगळे वागू. ... तर असे हे जगणे समृद्ध करणारे राष्ट्रीय सेवा योजनेचे जग!

## ग्रामीण कथाकार बाबासाहेब परीट यांची साहित्य अकादमीच्या संमेलनात कथाकथनासाठी निवड

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : सांगलीच्या शिराळा तालुक्यातील बिळाशी येथील ग्रामीण कथाकार बाबासाहेब परीट यांची भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयातर्फे ११ मार्च रोजी दिल्लीत होणाऱ्या साहित्य अकादमीच्या संमेलनात कथाकथनासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्रातील कथा कथनासाठी परीट यांची एकमेव निवड झाली आहे. परीट यांच्या निवडीमुळे सांगलीच्या साहित्य क्षेत्रात मानाचा तुरा खोवला गेला आहे. बाबासाहेब परीट यांनी आजवर अखिल भारतीय साहित्य संमेलन सांगली, पुणे,



ठाणे, डोंबिवली, चिपळूण, नाशिक अशा सहा संमेलनामध्ये निमंत्रित कथाकार म्हणून कथाकथन केले आहे.

सिंगापूर येथे झालेल्या तिसऱ्या विश्व साहित्य संमेलनात बाबासाहेब परीट यांची कथा खूप गाजली होती. महाराष्ट्रातील मातब्बर व्याख्यानमालेमध्ये त्यांचे कथाकथन झाले आहे. यामध्ये नाशिकची वसंत व्याख्यानमाला राजगुरुनगरची साहेबराव बुट्टे पाटील व्याख्यानमाला, बारामतीची शरद पवार यांच्या आईच्या नावाची शारदा व्याख्यानमाला यांसह चेन्नई, छत्तीसगड, कर्नाटक येथील अनेक साहित्य संमेलनामध्ये त्यांनी दर्जेदार कथा सादर करून रसिकांच्या मनावर अधिराज्य केले आहे. परीट हे जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून ही कार्यरत आहेत. शैक्षणिक तसेच सामाजिक कार्यातही ते नेहमी अग्रेसर असतात. त्यांच्या निवडीमुळे साहित्य क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## जिल्हा पोलीस दलाच्या ताफ्यात आता नव्याने ३१ वाहने दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : जिल्हा पोलीस दलाच्या ताफ्यात आता नव्याने ३१ वाहने दाखल झाली आहेत. यामध्ये एक महिंद्रा थार, १२ बोलेरो, आठ स्ट्राइकिंग वेहिकल आणि दहा अत्याधुनिक मोटारसायकलचा समावेश आहे. आज बुधवार दि. ०६ फेब्रुवारी रोजी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते या वाहनच लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. या वाहनामुळे पोलिसांना पेट्रोलिंगसह घटनास्थळी जलद पोहोचण्यास मदत होणार आहे.

सांगली जिल्हा पोलीस दलाला विविध कामांसाठी जिल्हा नियोजन मधून ९ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. पोलीस दलातील बांधकामांच्या कामासाठी पाच कोटींचा निधी तर वाहने आणि बिनतारी संदेश सामग्री खरेदी करण्यासाठी १ कोटी ६९ लाख असा एकूण ९ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. यातूनच पोलीस दलासाठी तब्बल ३१ नवी वाहने खरेदी करण्यात आली आहेत. यामध्ये परेड साठी एक थार, १२ बोलेरो, एक अत्याधुनिक डॉग व्हॅन आणि तर आठ लाईट (स्ट्राइकिंग) व्हेहिकलचा समावेश आहे. नव्या वाहनांमुळे पोलिसांना पेट्रोलिंग तसेच एखादी महत्वाची घटना घडली तर त्याठिकाणी तातडीने पोहोचण्यास मदत होणार आहे. आज बुधवार दि. ०६ मार्च रोजी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते सायंकाळी वाहनांचा लोकार्पण सोहळा पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणात होणार आहे.

## महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना कवठेमहांकाळ तालुका 'केंद्रसमन्वयक' राजू इंगळे यांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटना कवठेमहांकाळ तालुका 'केंद्र समन्वयक' नियुक्ती राजू इंगळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवनगर (आगळ गांव) यांची सर्वानुमते एकमताने निवड करण्यात आली. यावेळी श्री. राजू इंगळे यांचा महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय संघटना कवठेमहांकाळ तालुकाध्यक्ष श्री. सादू पांढरे यांनी स्वागत व अभिनंदन केले. सोबत समिती तालुका उपाध्यक्ष श्री. चंद्रकांत सातपुते, क.महांकाळ तालुका कार्याध्यक्ष श्री.अनिल हंकारे, श्री. श्रीकांत पाटील -




वाघमोडे, तालुका संपर्कप्रमुख राजू आटपाडकर उपस्थित होते.केंद्रसंघटक किरण वाघमारे, गौतम शिंदे,बाबासो झिटे आदि संघटना कार्यकर्ते,जिल्हाध्यक्ष सुनिल सुर्यवंशी,जिल्हा उपाध्यक्ष बाबासो जानकर,बाबासाहेब कणवाडी, जिल्हा कोषाध्यक्ष शिवाजी करवर,जिल्हा संघटक किशोर भंडारी, कार्य. सदस्य लक्ष्मण शिंदे, मार्गदर्शक संतोष काटे, राज्य उपाध्यक्ष प्रल्हाद हुबाळे, पुणे विभागीय सचिव महिला प्रतिनिधी श्रीदेवी कांबळे, शोभा लोंढे यांच्याकडून दूरध्वनीद्वारे अभिनंदनीय कौतुक करण्यात आले;आणि संघटनेला पुढील कामासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## चिंचणी येथे आज पासून श्री रामलिंग यात्रेला सुरुवात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

चिंचणी : तालुक्यातील चिंचणी (अं) येथे महाशिवरात्री निमित्त श्री रामलिंग यात्रा साजरी होत आहे. प्रथेप्रमाणे चालू असलेली यात्रा दि. ९ मार्च रोजी रथोत्सव व भव्य शोभा यात्रा होणार आहे.या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



चिंचणी (अं) येथील रामलिंग मंदिराचे वैशिष्ट्य प्रभू श्री राम वनवासामध्ये जेव्हा दंडकारण्यामध्ये नाशिक त्रंबेकेश्वर मधून दक्षिणेकडे भ्रमंती करत असताना सोनहिरा परिसरातील बेलगंगेच्या काठावर सध्या असणार्या रामलिंग मंदिरा चिंचणी(अं) या ठिकाणी महाशिवरात्री दिवशी या मंदिरातील शिवलिंग प्रभू श्री रामांनी स्वतःच्या हाताने स्थापन करुन शिवपार्वतीची उपासना केली अशी आख्यायिका आहे.त्या ठिकाणी कालांतराने रामभक्तांनी श्री रामलिंग मंदिर उभारले तो त्या काळापासून चालत आलेल्या उत्सव रामभक्तांनी राम यात्रेच्या निमित्ताने अंखड चालू ठेवला असून सध्या भव्यदिव्य रथोत्सव साजरा होत आहे.

या यात्रेत बुधवार,दि. ६ मार्च रोजी रात्री ८.३० वाजता कीर्तनसेवा ह.भ.प.सौ.सुप्रियाताई संदिप खंडागळे संगीत विशारद यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. गुरुवार, दि. ७ मार्च रोजी रात्री ९ वाजता बहुचर्चित शिवरायांचा छावा चित्रपट श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक चिंचणी(अं) येथे होणार आहे. तसेच रात्री ९.३० वाजता भजन सेवा जन जनार्धन भजनी मंडळ चिंचणी (अं) यांचेकडून होणार आहे.शुक्रवार, ८ मार्च रोजी सकाळी ५.३० ते ६.३० वाजेपर्यंत रामलिंग मंदिर येथे श्री महादेव व राम अभिषेक, सकाळी ८.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत व शिवलीलामृत पारायण, सायं. ७.०० वाजता आरती, रात्री ९वाजता भजनसेवा श्री ज्ञानेश्वर पारायण मंडळ ,चिंचणी(अं) यांचे कडून होणार आहे.तसेच शनिवार, दि.९ मार्च रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून प्रत्येक घरातून रामलिंग मंदिरामध्ये पुरण पोळ्यांचा नैवेद्य स्विकारण्यात येणार असून दुपारी १२ पासून महाप्रसाद होणार आहे.

सायंकाळी ५ वा. पासून श्री राम रथोत्सव भव्य शोभायात्रा श्री लालगिरी महाराज मठ ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर महाआरतीने शेवट होणार आहे .रात्री ९ वाजता भजनसेवा जनजागृती भजनी मंडळ ,चिंचणी (अं) यांचे होणार आहे.रविवार, दि.१० मार्च रोजी पहाटे ५.३० वाजता श्री भवानी मंदिर येथे श्री भवानी मातेस अभिषेक होवून पुढे खारी यात्रेस प्रारंभ होणार आहे.

## व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम बंद करून नवीन अभ्यासक्रम सन २०२४-२५ पासून सुरु करण्यास मान्यता

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : राज्यात सद्यस्थितीत सुरु असणारे व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम बंद करून राष्ट्रीय व्यवसाय आराखड्याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सर्व शासकिय व अशासकिय अनुदानित व अशासकीय कायम विनाअनुदानित संस्थामध्ये शैक्षणिक सन २०२४-२५ पासून सुरु करण्यास दि. २६ डिसेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच या अभ्यासक्रमांच्या मानकांना दि. ५ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे, असे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एम. डी. जोशी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत सद्यस्थितीत सुरु असणारे द्विलक्षी व्यवसाय अभ्यासकम बंद करून राष्ट्रीय व्यवसाय आराखड्याप्रमाणे ५ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये स्तंभ ५ मध्ये दर्शविण्यात आलेले नवीन अभ्यासकम सर्व शासकिय, अशासकिय अनुदानित व अशासकीय कायम विनाअनुदानित संस्थामध्ये शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सुरु करून सद्यस्थितीत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांमध्ये सत्र २०२४-२५ पासून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश करण्यात येवू नये, असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

या अभ्यासक्रमांच्या सैद्धांतिक व प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन व आयोजन हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत होणार असून सदर विषयांच्या सैद्धांतिक परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत व प्रात्यक्षिक परीक्षा महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत घेण्यात येईल. नवीन अभ्यासक्रम हे NSQF (N-TION-L Skill Qualion (PSSCIVE) Bhopl à_mUo Pandit sunderlal Sharma Institute of Vocational Education Psscive Bhopal यांच्याकडून मान्यताप्राप्त आहेत.

राज्यात राबविण्यात येणारे नवीन द्विलक्षी व्यवसाय अभ्यासकम जॉब रोल परिशिष्ट अ प्रमाणे असतील गटात दर्शविण्यात आलेले विषय- १ व विषय- २ हे प्रत्येकी १०० गुणांचे असतील व द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्याकरीता महाविद्यालयास गटातील दोनही अभ्यासक्रमांची निवड करुन आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांना सद्यस्थितीत २०० गुणांचा एक द्विलक्षी अभ्यासक्रम निवडावा लागतो, त्याऐवजी गटातील प्रत्येकी १०० गुणांचे विषय- १ व विषय- २ निवडणे आवश्यक राहील. तसेच द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या नवीन महाविद्यालयांना आवश्यक मानकांप्रमाणे पूर्तता केल्याशिवाय मान्यता देण्यात येणार नाही. केमिकल प्लॉट ऑपरेटर, फिश प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी व फ्रेश वॉटर फिश कल्चर हे व्यवसाय अभ्यासक्रम सुरु रहाणार नसल्याने या अभ्यासक्रमांमध्ये सत्र २०२४- २५ करीता इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश करता येणार नाहीत. त्यामुळे या व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी सहपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या अन्यव्यवसाय अभ्याक्रमांची निवड करून सदर व्यवसाय अभ्यासक्रम ११ वी साठी शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सुरु करण्याकरीता महाविद्यालय व्यवस्थापनाने संचालनालयाच्या vti.dvet.gov.in या संकेतस्थळावर विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील, असे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# राजर्षी शाहू महाराजांचा चित्ररथ राज्याच्या प्रगतीचा रथ ठरावा : सांस्कृतिक कार्य मंत्री, सुधीर मुनगंटीवार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : एव्हरेस्ट पेक्षाही मोठं काम आणि थोर कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. याचे शब्दातही कल्पनाचित्र करु शकत नाही. त्यांनी केलेले कार्य आणि त्यांचे विचार आजच्या पिढीला कळावेत यासाठी या चित्ररथाचे आयोजन करण्यात आले आहे. एकूणच राजर्षी शाहू महाराजांचा हा चित्ररथ राज्याच्या प्रगतीचा रथ ठरावा, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री, सुधीर मुनगंटीवार यांनी केले. कोल्हापूर येथून राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने तयार करण्यात आलेल्या शाहू महाराजांच्या जीवनकार्यावरील चित्ररथाचे उद्घाटन त्यांचे हस्ते ऑनलाइन झाले, त्यावेळी बोलत होते. या कार्यक्रमात पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रमुख उपस्थितीत चित्ररथाला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आले. दसरा चौकात झालेल्या या कार्यक्रमात जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी रथाचे पुष्प अर्पण करुन पूजन केले. यावेळी ज्येष्ठ कलावंत राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त झालेले शिवशाहीर राजू राऊत, सांस्कृतिक कार्य



विभागाचे सहसंचालक श्रीराम पांडे उपस्थित होते.

राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य तरुण पिढीला कळावे हा या मागील मुख्य उद्देश असून हा चित्ररथ कोल्हापूर जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या ठिकाणी प्रदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार व पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या उपस्थितीत दूरदृश्यप्रणालीद्वारे चित्ररथाचे उदघाटन झाले. राजर्षी शाहू महाराज हे लोकशाहीवादी व समाज सुधारक राजे होते. सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केले. त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये अनेक लोकोपयोगी निर्णय घेऊन कार्यक्रम, योजना, उपक्रम राबविले होते. त्यांची दूरदृष्टी व कल्पकता यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या सकारात्मक घडामोडी घडलेल्या होत्या असे मंत्री मुनगंटीवार यांनी गौरवोद्गार काढले. पालकमंत्री तथा वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय मंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी कमी कालावधीत शेतकरी, गोर गरीब तसेच मागासवर्गीय लोकांसाठी काम केले. सर्व जातीधर्मासाठी बोर्डिंग सुरू केली. शिक्षण, प्रामाणिक न्याय देणाऱ्या राजाने संपूर्ण देशाला आदर्श निर्माण केला. अशा या शाहू महाराजांच्या भूमीतून अल्पसंख्यांक व्यक्ती देखील मंत्रीपदापर्यंत गेला हे भाग्यच असे प्रतिपादन त्यांनी केले.

# कुपवाड रोडवरील लक्ष्मी मंदिर चौकात ट्राफिक सिग्नल मंजूर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : कुपवाड रोड श्री.लक्ष्मी मंदिर चौक येथील वाहतूक नियंत्रण करण्यासाठी स्वयंचलित ट्राफिक सिग्नलचे भूमिपूजन माननीय आमदार श्री. सुधीर दादा गाडगीळ यांचे हस्ते संपन्न झाले. लक्ष्मी मंदिर चौकामध्ये वारंवार अपघात होत होते त्यामुळे तेथील नागरिक व भाजपा पदाधिकारी वारंवार आंदोलन व मागणी करत होते याची दखल घेऊन लक्ष्मी मंदिर चौकामध्ये वाहतूक व्यवस्था सुरळीत करणेकामी नविन वाहतूक सिग्नल यंत्रणा उभारणी करणेस जिल्हा वार्षिक योजने तून सदर कामास आमदार सुधीर दादा गाडगीळ यांनी मंजुरीमिळवून सदर सिग्नलला र.रू.१२,५०,००२/- इतका निधी उपलब्ध करून दिला सदर निधी जिल्हा नियोजन समितीकडून महापालिकेस वर्ग झालेला आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे, व अपघात नियंत्रण करणे साठी लक्ष्मी मंदिर चौकामध्ये सिग्नल यंत्रणा करणे. आवश्यक होते. लक्ष्मी मंदिर चौकात ट्राफिक सिग्नलचे भूमिपूजन झाल्याने नागरिकांमध्ये सकारात्मक व आनंदी वातावरण आहे. सदर भूमिपूजना वेळेस उपायुक्त राहुल रोकडे , उपायुक्त स्मृती पाटील, (विद्युतअभियंता) अमरसिंह चव्हाण, माजी नगरसेवक राजेंद्र कुंभार, विष्णू माने, प्रशांत पाटील, कल्पना कोळेकर, जमीर रंगरेज, मोहन जाधव, विश्वजीत पाटील, सुनील भोसले, श्रीकांत वाघमोडे, रवींद्र ढगे, प्रवीण कुलकर्णी, राजू पठाण, अतुल माने तसेच वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

# सातारा, कोल्हापूर, सांगली आणि हातकणंगलेत महाविकास आघाडीचे उमेदवार ठरले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

गुरुबाळ माळी, कोल्हापूर : कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसतर्फे श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, हातकणंगलेत महाविकास आघाडीच्या पाठिंब्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी आणि सांगलीत शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने विशाल पाटील अथवा चंद्रहार पाटील यांची नावे जवळजवळ निश्चित झाली आहेत. त्याची अधिकृत घोषणा आठ दिवसात होण्याची चिन्हे आहेत.

कोल्हापूर व हातकणंगले या दोन्ही मतदारसंघात मागील वेळी शिवसेनेने विजय मिळवल्याने ठाकरे गटाने त्यावर हक्क सांगितला. स्वाभिमानी संघटना महाविकास आघाडीसोबत येणार असल्याने हातकणंगलेची जागा त्यांच्यासाठी सेनेने सोडली. दुसरी कोल्हापूरची जागा श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्यासाठी सोडावी लागणार आहे. कारण हाताच्या चिन्हावर लढण्याची महाराजांची इच्छा आहे. सेनेने यामुळे ही जागा काँग्रेसला सोडण्याचे मान्य केले आहे.

दोन जागा मित्र पक्षासाठी सोडल्याने दक्षिण महाराष्ट्रात एक तरी जागा लढवावी यासाठी शिवसेनेने सांगलीची जागा मागितली. तेथे काँग्रेसच्या विशाल पाटील यांची सेनेच्या चिन्हावर लढण्याची मानसिकता नाही. पण जागा वाटपात सेनेला हा मतदार संघ सोडावा लागणार आहे. मागील वेळी ऐनवेळी त्यांच्या हातात स्वाभिमानी संघटनेची बॅट हातात देण्यात आली. पाटील तयार नसतील तर पैलवान चंद्रहार पाटील यांचा पर्याय सेनेने पुढे केला आहे. चंद्रहार यांना काहीही करून निवडणूक लढवायची आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लढण्याची त्यांची तयारी आहे. त्यापेक्षा सेनेच्या तिकीटीवर लढण्यासाठी त्यांच्याशी चर्चा सुरू करण्यात आली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर कोल्हापूरातून श्रीमंत शाहू महाराज, हातकणंगलेतून शेट्टी आणि सांगलीतून विशाल अथवा चंद्रहार यांची नावे निश्चित झाली आहेत. शेट्टी हे आघाडीत येणार नसून त्यांना पाठिंबा देण्यात येणार आहे. त्या बदल्यात इतरत्र त्यांची मदत घेण्यात येणार आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी शरद पवार गटाला मिळणार हे निश्चित आहे. तेथे खासदार श्रीनिवास पाटील लढणार की त्यांचे सुपुत्र सारंग एवढाच मुद्दा आहे. यामुळे महाविकास आघाडीची पश्चिम महाराष्ट्रातील जागा वाटप झाल्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे. त्याची केवळ अधिकृत घोषणा होणे एवढेच शिल्लक आहे.

# कंत्राटी वीज कर्मचारी बेमुदत संपावर, महावितरण कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : मनोज रानडे समितीच्या अहवालातील शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करा, सर्व कामगारांना वयाच्या साठ वर्षापर्यंत कंत्राटदार विरहित शाश्वत रोजगार छचठ च्या माध्यमातून देऊन त्यांना रोजगारात सुरक्षा द्यावी, वीज कंपनीतील सर्व कंत्राटी कामगारांना नियमित सेवेत सामावून घ्यावे यासह अन्य मागण्यासाठी काल मध्यरात्री १२ वाजल्यापासून महावितरणचे सर्व कंत्राटी कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. कोल्हापुरात मंगळवारी ताराबाई पार्क येथील महावितरणच्या कार्यालयासमोर कंत्राटी कामगारांनी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले.यावेळी कंत्राटी कर्मचाऱ्यांनी शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण या तिन्ही वीज कंपन्यातील सर्व कंत्राटी कामगार हे अनुभवी व कुशल असून ते मागे १५ ते २० वर्षापासून काम करत आहेत. अशा सर्व वीज कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्या आजपर्यंत अनेक संघटनांनी शासन व प्रशासन दरबारी मांडल्या आहेत. मात्र या कामगारांना अद्याप रास्त न्याय मिळाला नाही. त्यामुळे राज्यातील तिन्ही वीज कंपनीत कार्यरत विविध कंत्राटी कामगारांच्या सर्व संघटना प्रमुखांनी एकत्र येऊन महाराष्ट्र राज्य वीज मंडळ



कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती २०२४ स्थापन केली आहे.

कंपनीतील सर्व वीज कंत्राटी कामगारांना आज रोजी मिळत असलेला एकूण पगारात दिनांक १०-एप्रिल २०२३ पासून मागील सर्व फरकास ३० टक्के वेतन वाढ करण्यात यावी. तिन्ही वीज कंपनीतीलमंजूर नियमित रिक्त पदांवर व गरजेनुसार काम करत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना नियमित सेवेत सामावून घ्यावे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार समान कामास समान वेतन देण्यात यावे. कोर्ट केस मधील आणि आयटीआय नाही म्हणून कामावरून कमी केलेल्या सर्व कामगारांना पुन्हा तातडीने कामावर घेण्यात यावे. भ्रष्ट कंत्राटदाराणा काळया यादीत टाकण्यात यावे. नक्षलग्रस्त भागात येणाऱ्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र तसेच पारेषण व वितरण कंपनीतील कंत्राट कामगारांना नक्षलग्रस्त भत्ता देण्यात यावा. यासह विविध मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री, कामगार आयुक्त ,प्रधान सचिव यांच्यासह विविध विभागांना पाठविण्यात आले आहे.

या आंदोलनाचे नेतृत्व अमर लोहार, विजय कांबळे, राहुल भालकर, जय माळी, मिलिंद कुडतरकर,अनिल लांडगे, प्रेमसागर देसाई यांनी केले.तर आंदोलनात शेकडो कंत्राटी कर्मचारी सहभागी आहेत. राज्यातील सर्वच कंत्राटी कर्मचारी बेमुदत संपावर गेल्याने राज्यातील वीज वितरणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जातीय.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर चेकपोस्ट नाका, वाहनांची तपासणी सुरु

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

म्हैसाळ : लोकसभा निवडणुकीची पार्श्वभूमीवर मिरज ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर म्हैसाळ जवळ चेकपोस्ट उभा केला आहे. याठिकाणी वाहनांची काटेकोरपणे तपासणी करण्यात येत आहे.

सद्या लोकसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता कधीही लागू शकते. याअनुशंगाने आंतरराज्य तसेच आंतरजिल्ह्यातील सीमा चौक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांना अधिक मजबुती देण्याचा निर्णय काल, मंगळवारी कोल्हापुरात झालेल्या समन्वय बैठकीत घेण्यात आला होता. दरम्यानच, मिरज ग्रामीण पोलिसांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर चेकपोस्ट उभा केले असून या पथकात दोन पोलीस अधिकारी, तीन पोलीस कर्मचारी, होमगार्ड यांचा समावेश करण्यात आला आहे.

निवडणुकीच्या कालावधीत वाहनातून बनावट दारु, गुटखा, अवैध धंदे यांची वाहतूक होण्याची शक्यता आहे. याला आळा बसावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी वाहनांची काटेकोरपणे तपासणी केली जात आहे.

# कोल्हापूर जिल्ह्यातील एकाच वर्षात दोनवेळा पीक कर्ज उचलणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणार प्रोत्साहनपर अनुदान

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यातील एकाच वर्षात दोन वेळा पीक कर्ज उचलणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केलेल्या पाठपुराव्याला हे यश मिळाले आहे. मंत्री श्री. मुश्रीफ यांच्या पाठपुराव्यामुळे शासन निर्णयात शुद्धिपत्रक होऊन प्रोत्साहनपर अनुदान योजनेतील जाचक निकष आता शिथिल केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील १४, ८०० ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानापोटीची मिळणारी ही रक्कम ७५ कोटी रुपयांच्या घरात आहे. प्रोत्साहनपर अनुदान योजनेतील जाचक निकषांमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी हे अनुदान मिळण्यापासून वंचित राहत होते. गेल्यावर्षी पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव करून तो शासनास पाठवण्यात आला होता. तसेच; ऊसपिक घेणाऱ्या शेतकऱ्यांवर कोणत्याही परिस्थितीत अन्याय होऊ देणार नाही, या भूमिकेतून पालकमंत्री श्री. मुश्रीफ यांनी मुख्यमंत्री, दोन्हीही उपमुख्यमंत्री व अर्थ विभागाकडे याबाबत पाठपुरावा केला. याबाबत अधिक माहिती अशी, राज्य सरकारने याबाबतचा एक निर्णय शुक्रवार दि. २९ जुलै २०२२ जारी केलेला होता. त्यानुसार सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या तीन आर्थिक वर्षांचा कालावधी विचारात घेण्यास मान्यता दिलेली होती. या तीनपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात कर्जउचल करून नियमितपणे परतफेड केलेले शेतकरी लाभार्थी म्हणून पात्र ठरणार होते. मात्र, जे शेतकरी या तीनपैकी एकच वर्ष कर्जउचल करून परतफेड केलेली आहे, ते या लाभापासून वंचित राहत होते. कोल्हापूर जिल्ह्यातील ऊसपिक कर्जाचे प्रमाण ९७% आहे. दरम्यान; राज्य सरकारने पिक कर्जाचे वितरण आर्थिक वर्षानुसार ग्राह्य धरल्यामुळे या तीन आर्थिक वर्षांमध्ये दोन हंगामाचे ऊस पिककर्जाचे वितरण होते. त्यामुळे कर्ज परतफेडीच्या तारखा लगतचा जून महिना व त्यापुढील जून महिना याप्रमाणे निश्चित होतात.

# आष्टा नगरपरिषदेमध्ये नवीन बांधण्यात आलेल्या सभागृहास छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव द्या

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आष्टा : आष्टा नगरपरिषदेमध्ये नवीन बांधण्यात आलेल्या सभागृहास छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे. तसेच त्या सभागृहात महापुरुषांची तैलचित्रे लावण्यात यावीत. अशी मागणी भिमशक्ती सामाजिक संघटना यांच्यावतीने करण्यात आली. याबाबत संघटनेचे प्रदेश सचिव विनय कांबळे यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात असे म्हटले आहे की, आष्टा शहरातील कोणत्याही शासकीय इमारतीस किंवा मार्केटला महापुरुषांची नावे दिलेली नाहीत. आष्टा नगरपालिकेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या नवीन सभागृहास महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे. तसेच या सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अशा सर्व महापुरुषांचे तैलचित्र सभागृहात लावण्यात यावीत. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

त्यामुळे पालिका प्रशासनाने सर्वसामान्य जनतेचा आदर राखून याचा त्वरित विचार करावा व आचारसंहिता लागण्यापूर्वी त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. अशी विनंती देखील करण्यात आली आहे.

# मिरजेत महिला दिना निमित्त ८ मार्च रोजी होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन : सौ. खाडे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मिरज : महिला दिना निम्मत ८ मार्च रोजी मिरज मधील मिरज हायस्कूल येथे होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात विविध खेळ आयोजित करण्यात आले आहेत. यात विजेत्या होणाऱ्या महिलांना सोने, एल ई डी टिव्ही, फ्रिज,पैठणी आणि नववारी साड्या बक्षिस देण्यात येणार आहेत. मिरज मतदारसंघातील ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना माऊली पुरस्कार बहाल करून सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती सौ. सुमनताई सुरेश भाऊ खाडे यांनी दिली. या कार्यक्रमास भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. होम मिनिस्टर कार्यक्रमात विविध खेळ आयोजित केले आहेत. यात विजेत्या होणाऱ्या महिलांना पहिले बक्षिस सव्वा तोळे सोने, दुसरे बक्षिस एक तोळे सोने, तिसरे बक्षिस अर्धा तोळे सोने, चोथे बक्षिस एल ई डी टिव्ही, पाचवे बक्षिस फ्रिज देण्यात येणार आहेत. तसेच १० नथ, ५० पैठणी, आणि १० नववारी साड्या बक्षिस म्हणून देण्यात येणार आहेत.

# राहुल खाडे विरोधात लाच लुचपतची कारवाई

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सांगली जिल्हा परिषदेचे तत्कालीन शाखा अभियंता राहुल खाडे याच्या विरोधात लाच लुचपतची विभागाने कारवाई केली असून बेनामी मालमता प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, तत्कालीन शाखा अभियंता राहुल विठ्ठल खाडे, (शाखा अभियंता छोटे पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद सांगली, वर्ग २, रा. रामकृष्ण परमहंस सोसायटीचे जवळ, जगदाळे प्लॉट, पोळ मळा सांगली याने भ्रष्ट मार्गाने पैसा व बेनामी मालमता गोळा केली असल्याबाबत सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागास तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता. प्राप्त तक्रारी अर्जाचे अनुषंगाने राहुल खाडे यांचे मालमत्तेची उघड चौकशी करण्यात आली आहे. चौकशी मध्ये शाखा अभियंता राहुल विठ्ठल खाडे, त्यांची पत्नी सौ सरोजिनी राहुल खाडे व त्यांची मुलगी विशाखा राहुल खाडे यांनी दि.७.११.१९८९ ते दि.२८.२.२०१५ या परिक्षण कालावधीत ज्ञात उत्पन्न स्त्रोताच्या विसंगत प्रमाणात १०२००११३/- रुपये (एक कोटी, दोन लाख, एकशे तेरा, रुपये) (९३ टक्के) इतकी अपसंपदा भ्रष्ट मार्गाने धारण केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

राहुल खाडे यांनी भ्रष्ट व गैर मार्गाने कमवलेली अपसंपदा धारण करण्यास त्यांची पत्नी सौ. सरोजिनी राहुल खाडे व त्यांची मुलगी विशाखा राहुल खाडे यांनी त्यांना अपप्रेरणा दिली असल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाल्याने लोकसेवक राहुल विठ्ठल खाडे, त्यांची पत्नी सौ. सरोजिनी राहुल खाडे व मुलगी विशाखा राहुल खाडे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये विश्रामबाग पोलीस ठाणे जि. सांगली येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

राहुल विठ्ठल खाडे व त्यांची पत्नी सौ सरोजिनी राहुल खाडे यांचेवर विश्रामबाग पोलीस ठाणे जि. सांगली येथे भाग-५ गु.र.नं.१६१/२०१० भादविसं कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे दि.१२.०७.२०१० रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यांतुन ते व त्यांची पत्नी जामीनावर मुक्त झाले पासुन ते व त्यांचे कुटुंबीय फरारी आहेत.

सदरची कारवाई अमोल तांबे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, मा. श्रीमती डॉ. शितल जानवे / खराडे, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, विजय चौधरी, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक यांनी केली आहे.

# भाजपने जत तालुक्याला न्याय दिला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जत : स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात पाण्यासाठी जत तालुक्यातील जनतेला केवळ संघर्ष करावा लागत होता मात्र भाजप सरकारने तालुक्यातील जनतेला न्याय दिला आह. विस्तारित म्हैसाळ योजना व अंकलगी योजनेला निधी दिला, असे प्रतिपादन भाजपचे जत विधानसभा निवडणूक प्रमुख तम्मनगौडा रवीपाटील यांनी केले.

विस्तारित म्हैसळ योजना व अंकलगी योजनेचा पाठपुरावा केल्याबद्दल संख ग्रामस्थांच्या शवतीने तम्मनगौडा रवीपाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उमदीचे माजी सरपंच निवृत्ती शिंदे, माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन



किरण पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विजय पाटील, शेतकरी संघटनेचे नेते राजू पुजारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

निवृत्ती शिंदे यांनी आमदार विक्रम सावंत यांच्यावर जोरदार टीका केली. आम्ही प्रामाणिकपणे विक्रम सावंत यांच्या पाठीशी उभे होतो. मात्र सावंत यांनी आमचे एकही काम केले नाही. आजपर्यंतचे सर्वात निष्क्रिय आमदार असल्याची टीका शिंदे यांनी यावेळी केली. यापुढे आपण रवि पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे शिंदे यांनी जाहीर केले. राजू पुजारी म्हणाले की, आमच्या अनेक पिढ्या दुष्काळाने उध्वस्त केल्या. भाजप शासनाने आता खरोखर न्याय दिला.

# विद्याताई चव्हाण यांची श्री सिद्धनाथ मंदिरास भेट



आटपाडी : मा. आम. विद्याती चव्हाण यांनी खरसुंडी येथील श्री. सिद्धनाथ देवस्थान मंदिरास भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार प्रसंगी उपस्थित आनंदराव पाटील, सादिक खाटिक, खरसुंडीचे युवा नेते राहुल गुरव व उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या राज्याच्या प्रवक्त्या, पक्षाच्या महिला आघाडीच्या राज्याच्या माजी अध्यक्षा, माजी आमदार विद्याताई चव्हाण यांनी खरसुंडी येथील श्री.सिध्दनाथांचे मंदिरास भेट देवून श्री सिध्दनाथांचे दर्शन घेतले. पश्चिम महाराष्ट्रातील विविध देवतांच्या दर्शनाच्या निमित्ताने त्या आज दुपारी १२.१५ च्या दरम्यान खरसुंडी येथे आल्या होत्या. देवदर्शना नंतर मंदिर देवस्थान ट्रस्टचे चेअरमन आणि खरसुंडीचे माजी सरपंच चंद्रकांतभाऊ पुजारी, माजी सरपंच सौ.अंजलीताई पुजारी, इत्यादी मान्यवरांनी शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ, ग्रंथ भेट देवून विद्याताई चव्हाण आणि त्यांच्या भगिनी कोल्हापूरच्या सामाजीक कार्यकर्त्या हेमाताई भोसले यांचा सत्कार केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आटपाडी तालुका अध्यक्ष आनंदरावबापु पाटील आणि राष्ट्रवादी महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रा.मोनिका पाटील यांच्या हस्ते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिकभाई खाटीक, पक्षाचे ओबीसी जिल्हाध्यक्ष जालींदर कटरे, पक्षाचे तालुका सरचिटणीस विजय पुजारी, पक्षाचे खरसुंडीचे नेते मदन जावीर, प्रा.आशा कदम-चव्हाण इत्यादींच्या प्रमुख उपस्थितीत विद्याताई चव्हाण यांचा शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देत सत्कार करणेत आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आटपाडी तालुका अध्यक्ष आनंदरावबापू पाटील, ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिक खाटीक यांच्यासह माजी सरपंच अंजलीताई गुरव, विजयराव भांगे, सुमंत पुजारी, राहुल गुरव, देविदास डमकले, संकेत पुजारी, शंकर गळवे इत्यादी अनेक जण उपस्थित होते.

# कोल्हापुरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : श्वान दंश झाल्यानंतर वेळेत आवश्यक ते सर्व उपचार करण्यात शासकीय दवाखान्यात हलगर्जीपणा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे कुत्र्याने चावा घेतलेल्या लोकांना काही दिवसांनी जीव गमवावा लागत आहे. कुत्रा चावला आहे, असे सांगत सीपीआर, तालुका रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्यानंतर त्याच्यावर वेळ मिळेल त्यावेळी उपचार केले जातात. ज्याला कुत्र्याने चावा घेतला आहे, त्याला कोणत्या प्रकारचे उपचार घेतले पाहिजेत, हे माहीत नसते. त्यामुळे संबंधित एक इंजेक्शन घेऊन निघून जातो, असे बहुतांशी श्वान दंश प्रकरणात होत आहे.

नागाळा पार्कातील युवतीचा श्वान दंश झाल्यानंतर रेबीजने मृत्यू झाल्यानंतर भटक्या कुत्र्यांचा आणि श्वान दंशावरील उपचाराचा विषय ऐरणीवर आला आहे. शहरातील सर्व भागात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. कुत्र्याने चावा घेतल्यानंतर चोवीस तासांच्या आत न्टी रेबीजचे



इंजेक्शन घ्यावेच लागते. कुत्रा चाटला असेल, दात लागला नसेल, जखमांचे फक्त व्रण असेल तर केवळ न्टी रेबीजचे इंजेक्शन घ्यावे लागते.

कुत्र्याचे दात लागले असतील किरकोळ जखम झाली असेल तर त्याच्या न्टी रेबीजचे इंजेक्शन चोवीस तासांत एक त्यानंतर तीन दिवसांनी, सात दिवसांनी, चौदा दिवसांनी, २८ दिवसांनी घ्यावे लागते. इंजेक्शन स्नायू आणि त्वचेत घ्यावे लागते. कुत्र्याने चावा घेतल्यानंतर रक्तस्त्राव झाला असेल न्टी रेबीजसह चोवीस तासांत जखमेजवळ न्टी रेबीज सिरमचे इंजेक्शन द्यावे लागते. श्वान दंश झालेल्या अनेकांना सिरमचे इंजेक्शन घ्यावे लागते, हेच सांगितले जात नाही.

त्यामुळे कुत्र्याने शरीराचे लचके तोडले तरी केवळ न्टी रेबीजचे इंजेक्शन देऊन पाठवले जाते. परिणामी काही दिवसांनंतर रेबीजची बाधा होण्याचा धोका असतो.

महापालिका घरफाळा घेत असताना कुत्रा कर घेते. या करातून शहरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त, निर्बिजीकरण करणे बंधनकारक आहे. हे काटेकोरपणे केले जात नसल्याने भटक्या कुत्र्यांचा हैदोस वाढला आहे. त्यांच्या हल्ल्यात बळी गेल्यास निष्काळजीपणाचा ठपका ठेवत महापालिका अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो. न्यायालयात भरपाईसाठी दाद मागता येते.

पाणी, उजेडाची भीती वाटणे, अन्न, पाणी गिळता न येणे, श्वसनाचा त्रास होणे अशी रेबीजची लक्षणे आहेत. कुत्र्याने चावा घेतल्यानंतर चार दिवस ते सहा महिन्यांपर्यंत रेबीज होण्याचा धोका जास्त असतो. मेंदूपासून किती जवळ कुत्र्याने चावा घेतला तितका रेबीजचा धोका वाढत जातो. काही प्रकरणांत तीन, सहा वर्षांनीही रेबीज झाल्याचे पुढे आले आहे.

# कृष्णा कालव्यातून दोन दिवसात पलूसला पाणी

*** सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवा कंदील**
*** रब्बी हंगामासाठी एक टीएमसी पाणी मिळणार**

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : कृष्णा कालव्यात पाणी सोडण्यासाठी सांगली जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना पत्र पाठविले आहे. त्यानुसार डुडी यांनी तारळी धरणातून कृष्णा कालव्यात एक टीएमसी पाणी सोडण्यासाठी हिरवा कंदील दाखविला आहे. या निर्णयामुळे पलूस, वाळवा, तासगाव, मिरज, कऱ्हाड तालुक्यातील ५४ गावांच्या पाणीटंचाईचा प्रश्न सुटणार आहे.

कृष्णा कालव्याचे पाणी पलूस तालुक्यातील तुपारी ते वसगडेपर्यंत जाते. तालुक्यातील बहुतांश शेती ही आरफळ व कृष्णा कालव्यावर अवलंबून आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून आरफळ योजना व कृष्णा कालव्यात पाणी सोडले नसल्याने या भागातील शेती धोक्यात आली आहे. पाण्याअभावी सध्या ऊस, द्राक्ष, केळी, भाजीपाला, फुले व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पाटबंधारे विभागातील राजकीय हस्तक्षेप थांबून कोर्टाच्या आदेशप्रमाणे कृष्णा कालव्यावर आरक्षित असलेले २.७० टीएमसी पाणी नियमित फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जून आवर्तन सुरळीत सुरू व्हावे, अन्यथा अजूनही भीषण परिस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. सर्व शेतकऱ्यांचा दृष्टीने कृष्णा कालव्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी शेतकऱ्यांची मागणी होती.

मात्र, सातारा जिल्ह्यातील काही लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपामुळे कृष्णा कालव्यात पाणी सोडले जात नव्हते. म्हणून शेतकरी आक्रमक झाले होते. याची गंभीर दखल घेऊन पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगली जिल्हाधिकारी डॉ.



राजा दयानिधी यांच्याकडे तारळी धरणातून कृष्णा कालव्यात रब्बी हंगामासाठी एक टीएमसी पाणी सोडण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यानुसार सांगली जिल्हाधिकाऱ्यांनी सातारा जिल्हाधिकारी यांच्याकडे एक टीएमसी पाणी सोडण्याची मागणी करणारे पत्र दिले आहे.

सातारा जिल्हाधिकारी डुडी यांनी सातारा जलसंपदा विभागाला तारळी धरणातून पाणी सोडण्याबाबत सूचना केली आहे. या निर्णयामुळे सांगली जिल्ह्यातील पलूस, वाळवा, तासगाव व मिरज तालुक्यातील १३ हजार ३६६ हेक्टर क्षेत्रातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

न्यायालयाने कृष्णा कालव्यात वर्षभरात २.७० टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत. तरीही पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि राजकीय नेत्यांकडून सांगली जिल्ह्यातील चार तालुक्यांतील ५४ गावांच्या हक्काचे पाणी अडविले जात आहे. खरीप आणि रब्बी हंगामामध्ये आतापर्यंत २.७० टीएमसीपैकी एकही टीएमसी पाणी सांगली जिल्ह्याला मिळाले नाही. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी न्यायालयाचे आदेशही पाळणार नाहीत का, असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

# लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची एकी कायम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा : सातारा लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने जोरदार तयारी केली असून मतदारसंघ कोणाकडेही जाऊ द्या, पण, एकी कायम ठेवणे आणि वज्रमूठ घट्ट ठेवण्याचा निर्धार प्रमुख नेत्यांनी केला आहे. तसेच तालुकानिहाय दौरे, सभा घेण्याबाबतही निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे महाविकास आघाडीने निवडणुकीसाठी एक पाऊल पुढे टाकल्याचे दिसून आले आहे.

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीत महाविकास आघाडीतील राजकीय पक्ष आणि विविध संघटनांची बैठक झाली. या बैठकीला काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट तसेच इतर संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सातारा मतदारसंघ कोणत्याही पक्षाला मिळो



पण, एकसंधपणे निवडणूक लढविणे, जिल्हास्तरावर समिती स्थापन करणे, जिल्ह्याचा स्वतंत्र जाहीरनामा काढणे, वज्रमूठ सभा घेणे, बुथ कमिटीत सर्वांना सामावून घेणे आदींसह इंडिया आघाडीची लढाई खूप मोठी आहे. एकत्र आलो तर मोठी क्रांती होईल. या क्रांतीसाठी हीच योग्य वेळ आहे, असे ठरविण्यात आले.

तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एकाधिकारशाही यापुढे सुरुच राहणार आहे. तीच भारताची लोकशाही म्हणून ओळखली जाईल अशी भीती आहे. त्यामुळे भाजप शासन मोदी सरकार असा प्रचार करत असून त्याविरोधात आवाज उठवणे गरजेचा आहे. इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांनी एकत्र येऊन आपला कोणी उमेदवार असेल तो कसा विजयी होईल याकडे पाहिले पाहिजे असे स्पष्ट केले. माजी मंत्री सतेज पाटील यांनीही लोकसभा निवडणुकीच्या लढाईसाठी जिल्हास्तरावर समन्वय समिती गठीत करणे गरजेचे आहे. यामध्ये त्यांनी निवडणुकीत वरिष्ठस्तरावरील मुद्दे न घेता स्थानिक घेणे आवश्यक आहे. बूथस्तरावर एजंट तयार करणे, गावोगावी कार्यक्रम घेणे, इंडिया आघाडीच्या सभा तालुकास्तरावर झाल्या पाहिजेत.

# सांगली जिल्ह्यात एक कोटीचे चारा बियाणे वाटप होणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : जिल्ह्यातील दूभत्या जनावरांसाठी जिल्हा पशुसंवर्धन विभागाकडून चारा बियाणे वाटप करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. जिल्ह्यातील एक कोटी रुपयांचे शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानावर बियाणे वाटप होणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन विभागाने दिली आहे.

जिल्ह्यात शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय केला जातो. दुधाचे अर्थकारण मोठे आहे. जिल्ह्यात १४ लाख ३ हजार ६३३ जनावरांची नोंद आहे. जिल्ह्यात यंदा पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे दिवसेंदिवस चारा टंचाईची भीषणता वाढू लागली आहे. दरवर्षी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत चारा बियाणेसाठी २५ लाखाच्या निधीची तरतूद केली जाते. तालुक्यातून किती शेतकरी चारा बियाण्यांची मागणी केली जाते, त्यानुसार बियाणे दिले जाते.

परंतू यंदा दुष्काळी परिस्थिती असल्याने सर्वच तालुक्यात चारा टंचाई भासणार असल्याने चारा बियाणांच्या निधीत ७५ लाखांनी वाढ केली आहे. अर्थात यंदा बियाणांसाठी एक कोटी निधीची तरतूद केली आहे. पहिल्या टप्प्यात ३० लाख रुपयांचे बियाणे शेतकऱ्यांना वाटप केले होते.

दुसऱ्या टप्प्यात ७० लाख रुपयांची तरतूदीतून बियाणे शेतकऱ्यांना देण्याचे नियोजन केले. त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील संबंधित विभागाला अर्ज मागवण्यासाठी उद्दिष्ट दिले होते. तसेच संबंधित विभागाकडून शेतकऱ्यांची चारा बियाणे मागणी अर्ज घेतले. प्रत्येक तालुक्यातून चारा बियाणांसाठी मागणी आली आहे.

शेतकऱ्यांनी चारा बियाणे मागणी केल्यानुसार याची तालुकानिहाय याद्या वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केली. त्यानंतर ड्रॉपध्दतीने शेतकऱ्यांनी निवड करुन शेतकऱ्यांना चारा बियाणे वाटप करण्याचे नियोजन केले. त्यानुसार प्रत्येक लाभार्थीला सात किलोचे पॅकींगमध्ये १४०० रुपयांचे मका बियाणे वाटप केले आहे.

# साताऱ्यात पाणीटंचाई; रिकामी भांडी घेऊन नागरिक रस्त्यावर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा : सातारा शहरात गेल्या काही दिवसांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या टंचाईने त्रस्त झालेल्या यादोगोपाळ पेठेतील रहिवाशांनी बुधवारी सकाळी रिकामी भांडी रस्त्यावर मांडून रास्ता रोको केला. या आंदोलनाची माहिती मिळताच पालिकेतील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन वितरण व्यवस्थेतील तांत्रिक अडचणी दूर करण्याचे आश्वासन नागरिकांना दिले.

सातारा शहरात उन्हाचा तडाखा सुरू झालेला असताना पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. त्यातही पालिकेकडून आठवड्यातून दोन दिवस पाणी कपात सुरू करण्यात आली आहे. या कपातीमुळे नागरिक आधीच हैराण झाले असताना कास योजनेच्या मुख्य जलवाहिनीला गळती लागत असल्याने शहराचा पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत आहे. पालिकेचा टँकर वेळेत मिळत नसल्याने नागरिकांना खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे.

गेल्या काही दिवसांपासून यादोगोपाळ पेठेतील गोल मारुती मंदिर परिसर, बोकील बोळ तसेच काशी विश्वेश्वर मंदिर परिसर येथील नागरिकांना तीव्र टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

# कोल्हापुरात 'एसबीआय' बँकेच्या दसरा चौक शाखेसमोर 'इंडिया आघाडीची' निदर्शने

**माणदेश एक्सप्रेस**

कोल्हापूर : केंद्रीय निवडणूक आयोगाला निवडणूक रोखे व्यवहाराचा तपशील देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही तो न पाळणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या विरोधात कोल्हापुरातील दसरा चौक शाखेसमोर बुधवारी इंडिया आघाडीच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

१५ फेब्रुवारी २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे कायदा असंविधानिक ठरवून रद्द करण्याचा निकाल दिला. निवडणूक रोख्यांची विक्री आणि खरेदी करण्याचा त्या कायद्याने केवळ आपल्या स्टेट बँक ऑफ इंडियाला अधिकार होता. त्या निकालाने १२ एप्रिलपासून आजतागायत झालेल्या या रोखे व्यवहाराचा सर्व तपशील निवडणूक आयोगाला देण्याचा आदेश दिला आहे. तो तपशील निवडणूक आयोगाने १३ मार्च २०२४ पर्यंत जनतेच्या माहितीसाठी त्यांच्या संकेतस्थळावर जाहीर करण्याचाही सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे.

तरीही ही माहिती देण्यासाठी ३० जून २०२४ ही अंतिम तारीख मागणारे निवेदन ५ मार्च २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाला सादर केल्याचे वृत आहे, अशी वस्तुस्थिती असेल, तर ती



अतिशय धक्कादायक बाब असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान आहे, असा इंडिया आघाडीचा दावा आहे. म्हणूनच ही निदर्शने करण्यात आली.

आजच्या डिजिटल युगात, बँकेचे सर्व व्यवहार डिजिटल पद्धतीने चालत असल्याने माहिती देण्यासाठी इतका कालावधी लागण्याचे काहीच कारण नाही. या कृत्याने स्टेट बँक ऑफ इंडियाने भारतीय न्याय व्यवस्थेला आव्हान दिले आहे. हे कृत्य केंद्र सरकारच्या दबावाखाली करण्यात आले असल्याचा आरोप इंडिया आघाडीने केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करणाऱ्या एसबीआर अधिकाऱ्यांचा धिक्कार असो, मोदी सरकारपुढे नाक घासणाऱ्या अधिकाऱ्यांचा धिक्कार असो, बँक आमच्या हक्काची, नाही कोणाच्या बापाची अशा घोषणांनी दसरा चौक परिसर दणाणून सोडला. आर. के. पोवार, संजय पवार, विजय देवणे, उदय नारकर, दगडू भास्कर, संदीप देसाई, संभाजीराव जगदाळे, रघुनाथ कांबळे यांनी या निदर्शनाचे नेतृत्व केले.

# कावळा नाका येथील रेस्ट हाऊसचा बाजार; १०० कोटींची जागा घातली थेट बिल्डरच्या घशात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : सध्याच्या बाजारभावाप्रमाणे किमान १०० कोटी रुपये किमतीची कावळा नाका येथील रेस्ट हाऊसची जागा ६० वर्षे कराराने थेट खासगी बिल्डरच्या घशात घालण्याचे पाप महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने केले आहे. कोल्हापूरच्या माथी टोल लादण्याचे कामही याच महामंडळाचे होते. एवढ्या कमी किमतीत या जागेचा लिलाव करताना बिल्डरने महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे आणि अन्य कुणाचे कुणाचे किती खिसे भरले याचीच चौकशी होण्याची गरज आहे. पूर्ण ६० वर्षे कंपनीने रस्ते महामंडळास वार्षिक ४ लाख २९ हजार रुपये (म्हणजेच चौरस फुटास १० रुपये) भाडे द्यायचे आहे.

कावळा नाका रेस्ट हाऊस म्हणून बी ग्रेडमधील हेरिटेज वास्तू अशी ओळख असलेल्या या जागेवर मागच्या पाच-सहा वर्षांपासूनच काहींचा डोळा होता. एकूण जागा, त्यावर होणारे कमर्शियल बांधकाम, त्याचा तिथे असलेला दर या सगळ्याचा विचार केल्यास ती १०० कोटींची असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे महापालिकेच्या अधिकाऱ्यांवरही आपल्याला हवा तसा अहवाल देण्यासंदर्भात कमालीचा दबाव होता.

परंतु या जागेच्या व्यवहारासाठी जी पत्रे, अहवाल महापालिकेने पाठवले आहेत अशी किमान आठ-दहा पत्रे आहेत. परंतु त्यामध्ये महापालिका सातत्याने एकाच भूमिकेवर ठाम राहिली आहे. ही जागा हेरिटेज वास्तू या प्रकारात मोडणारी असल्याने तिचा वापर बदलण्याचा अधिकार आम्हाला नाही. त्यामुळे या जागेसंदर्भात जो काही निर्णय घ्यायचा आहे तो शासन स्तरावरच व्हावा. त्यामुळे शासनाने स्वत:च्या अधिकारात महाराष्ट्र प्रादेशिक



व नगर नियोजन अधिनियम १९६६ च्या कलम ३७ नुसार अधिकाराचा वापर करून ही जागा वाणिज्य वापर प्रकारामध्ये समाविष्ट केली आहे.

ही जागा बिल्डरला देताना राज्य रस्ते महामंडळ व संबंधित एलएलपी कंपनी यांच्यामध्ये ८ जुलै २०२३ भाडेकरार झाला. ही पूर्ण रहिवास विभागातील कोल्हापूरचे नाक म्हणता येईल, अशा मोक्याच्या ठिकाणी असलेली जागा आहे. महाराष्ट्र हायवे क्ट १९५५ च्या २०१८ ला लागू झालेल्या यु-एस ६३ ए नियमान्वये जागेचा वापर कसा करायचा याचा अधिकार रस्ते महामंडळाने आपल्याकडे घेतला आणि त्यांनी संबंधित कंपनीकडून २८ मे २०२१ करारासंबंधीचे संमतीपत्र स्वीकारले.

हे संमती आल्यानंतर भाडेकरार करण्यासाठी संबंधित बिल्डरने या प्रकल्पासाठी स्वतंत्र एलएलपी कंपनी स्थापन केली व करार करून या कंपनीला ही जागा बहाल केली. एकूण ४६ हजार ११७ चौरस फूट जागेतील ३२१९ चौरस फूट हेरिटेज बांधकाम वगळून उर्वरित जागा विकसित करण्याची परवानगी दिली. हेरिटेज समितीची पूर्व संमती बांधकामासाठी घेण्याची अट घातली असली तरी शासनच बिल्डरच्या पाठीशी असल्याने ही अट कागदावरच राहिली तरी आश्चर्य वाटू नये.

या एक एकर दोन गुंठे जागेच्या मोबदल्यात संबंधित एलएलपी कंपनी रस्ते महामंडळास एकवेळच्या प्रीमियमपोटी १२ कोटी ६० लाख रुपये आरटीजीएसने २८ मे २०२१ ला दिले आहेत. वापरात येणारी मूळ जागा ४२००० चौरस फूट असली तरी त्या जागेचा एफएसआय (२.७६ टक्के) त्यावरील टीडीआर आणि वाढीव एफएसआय विचारात घेता १ लाख ७६ हजार चौरस फुटाचे बांधकाम तिथे होऊ शकते. या जागेच्या भाड्यापोटी संबंधित कंपनीने वर्षाला ४ लाख २९ हजार रुपये भाडे वर्षाला द्यायचे आहे. ही रक्कम २ कोटी ५८ लाख रुपये होते. म्हणजे किमान १०० कोटींची ही मौल्यवान जागा त्या कंपनीस १५ कोटी रुपयांना मिळाली आहे.

राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करून जागा वाणिज्य होण्यासाठी प्रयत्न केले. प्रस्तावाला त्यांचे ५ जानेवारी २०२१ चे पत्रही संदर्भ म्हणून जोडले आहे. या भूमापन क्रमांक २०१ मधील ४२९८ चौरस मीटर जागा सार्वजनिक-निमसार्वजनिक वापर वगळून वाणिज्य वापर विभागात समाविष्ट करण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाने शासनास पत्र क्रमांक २४५ अन्वये १२ जानेवारी २०२१ प्रस्ताव सादर केला. त्यावर महापालिकेने १४ सप्टेंबर २०२२ ला अहवाल दिला. हे सगळे संदर्भ या निर्णयाला आहेत.

या कंपनीसोबत केलेला ६० वर्षांचा करार हा कागदोपत्री ६० वर्षांचा असला तरी तो त्यानंतरही पुढे कायम होतो. त्यामुळे आताचा करार हा खरेदी खतासारखाच असल्याचे मानले जाते. थेट खरेदी करता येत नाही म्हणून असा करार केला जातो, असे तज्ज्ञांचे मत आहे. मुद्रांक शुल्क विभागाने या जागेची मुद्रांक शुल्कासाठी निश्चित केलेली किंमत १३ कोटी ७० लाख रुपये असल्याचे त्या करारात म्हटले आहे. तेवढीही रक्कम भरून घेतलेली नाही.